स्थापना
१ मे १९५७

# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

D:\STAPATYA 2026-27\प्रसिद्धीपत्रक.docx42

श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११०३७
www.apmcpune.in / Email: admin@apmcpune.in, kubspune37@rediffmail.com

जा.क्र.प्रशा/स्थापत्य/करणे/मु.बा.आ./पा.सो.नि.बा.आ./मोबा.टॉय.माग./८३८ /२०२६-२७ दि. ३/०७/२०२६

## प्रसिध्दीपत्रक

**विषय:-** कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे येथे येणा-या संतश्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराज व जगदगुरु श्री. संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याबरोबर बाजार आवारात येणा-या वारकरी बांधवांची स्वच्छतागृहांची सोय होणेकरीता लागणा-या अतिरिक्त मोबाईल टॉयलेट भाड्याने मिळणेबाबत..

सक्षम ठेकेदारांना कळविणेत येते की, **कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे येथे येणा-या संतश्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराज व जगदगुरु श्री. संत तुकाराम महाराज, पालखी सोहळयाबरोबर बाजार आवारात येणा-या वारकरी बांधवांची स्वच्छतागृहांची सोय होणेकरीता दि.९/०७/२०२६ ते दि.११/०७/२०२६ या ३ दिवसांच्या कालावधीकरीता अतिरिक्त मोबाईल टॉयलेट भाड्याने पुरवठा करणेचे** काम करावयाचे आहे. सदर कामे ही शासनाने आदेशित केलेल्या सर्व अटींचे काटेकोरपणे पालन करूनच करावयाची आहेत. काम करतेवेळी कोणत्याही कामगारांची वित्त/जिवितहानी/अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. काम करावयाच्या ठिकाणी आपण स्वत: (ठेकेदार) यांनी संस्थेच्या स्थापत्य विभागाच्या संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यां सोबत जाऊन, प्रत्यक्ष रित्या कामाची पाहणी करुन तद्नंतरच आपल्या मोहरबंद दरपत्रके सादर करावीत. काम करतेवेळी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत ठेकेदाराची राहील. सदरचे काम हे तत्सम / संबंधित प्रकारचे काम करणा-या ठेकेदारांकडून अल्प मुदतीत (५ दिवसात) दरपत्रके मागवून काम करावयाचे आहे.

तरी सदर कामाची मोहरबंद दरपत्रके दिनांक ६ /०७/२०२६ अखेर या कार्यालयात सादर करावीत. सादर झालेली मोहरबंद दरपत्रके शक्य झाल्यास त्याच दिवशी दिनांक ६ /०७/२०२६ रोजी उपस्थित ठेकेदारां समोर उघडण्यात येतील, कोणतेही अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणेने राखून ठेवला आहे, याची नोंद घ्यावी.

सदरचे प्रसिद्धीपत्रक मुख्य कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर व बाजार समितीच्या (Www.apmcpune.in) या संकेत स्थळावर दर्शविणेत येत आहे.

सचिव
कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

Scanned with OKEN Scanner